## प्रकरण दुसरे

## महाराष्ट्रातील गणपती आणि शिवाजी चळवळ व राजकीय मिथकांची गरज

# प्रकरण दुसरे

## महाराष्ट्रातील गणपती आणि शिवाजी चळवळ व राजकीय मिथकांची गरज

महाराष्ट्रात गणपती उत्सवाची आणि शिवाजी उत्सवाची सुरुवात लोकमान्य टिळक यांनी केली. टिळकांच्या मते पेशवाईत गणपती उत्सव मोठ्या प्रमाणात होत होता. तो इंग्रजी राजवट हिंदुस्थानात आल्यावर बंद पडला. [१] पुण्यात १८९३ साली हिंदू मुसलमानाचे दंगे झाले. हिंदू लोक मुसलमान समाजाच्या "मोहरम आणि ताबूत या सणात व कार्यक्रमात सहभागी होतात व ताबूताला नवस सायास करतात. त्याची मनोभावे पूजा करतात हे टिळक यांच्या लक्षात आले व मुसलमान लोक हिंदू लोकांना सलोख्याने वागवून घेण्यास तयार नसतात. हिंदूना ताबूतापासून परावृत्त करावे व त्यांना स्वधर्माशी संबंध असलेली अशी कांही तरी नवीन करमणूक मिळवून द्यावी याच उद्दिष्टार्थ टिळक यांनी गणपती उत्सवाची सुरुवात केली. सार्वजनिकरित्या उत्सव साजरा करण्याची प्रथा पाडली. असे टिळक यांचे सहकारी न. चि. केळकर यांनी म्हटले आहे. [२] राष्ट्राच्या अभ्युदयासाठी असले उत्सव असणे गरजेचे असते. कोणत्याही देशात ऐक्याची वृध्दी होण्यासाठी जी अनेक साधने असतात त्यापैकीच उपास्य दैवत एक असणे महत्वाचे ठरते. वर्षातून १० दिवस का होईना एकाच देवाच्या भजन पूजनात लोक मग्न झाल्यास त्यांच्यात एकी निर्माण होईल. [3] व लोक एकत्र आल्यामुळे ते आपापसात विचार विनिमय करतील आणि या विचार विनिमयामुळे सर्व समाजात सामंजस्याचे व एकोप्याचे चित्र दिसेल. राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नाबाबत लोक खल करतील. आपल्यावर होणाऱ्या परकीय सत्तेचा अन्याय दूर करतीले. किंबहुना तसा

प्रयत्न करतील व एकमेकांना जागृत करतील. सुशिक्षित लोकांना एक नवे व्यासपीठ मिळेल. समाजप्रबोधन होईल. हाच हेतू गणपती उत्सव सुरु करण्यामागे होता. राष्ट्राच्या अभ्युदयासाठी आणि लोकांच्यातील ऐक्याची वाढ होण्यासाठी गणपतीसारखे दुसरे साधन नाही. असे लोकमान्य टिळक यांचे मत होते. टिळक यांच्या मते, "एकधर्म, एक राजा, एक भाषा ही राष्ट्रीयत्वाची प्रधान अंगे आहेत. राजकीय उपास्य दैवत एक असल्यामुळे या उत्सवापासून फायदा होतो. टिळकांच्या मते, "हिंदू धर्मात सण पुष्कळ आहेत. पण ते आपआपल्या घरी साजरे करावयाचे आहेत. तेव्हा सार्वजनिक ठिकाणी असले उत्सव साजरे करता येतात. शिवाय ठिक-ठिकाणच्या लोकांना आपआपल्या गावी असले उत्सव साजरे करता आले पाहिजेत." ४ आणि हेच वैशिष्टय गणपती उत्सवाचे आहे."

टिळकांना या उत्सवासंबंधी असे वाटत होते की, ज्या प्रमाणे ख्रिस्ती व मुसलमान धर्मात सार्वजनिक प्रार्थनेची पध्दत आहे त्याप्रमाणे कांही पध्दत हिंदू ५ धर्मात असली पाहिजे. त्यासाठी गणपती उत्सव ठिकठिकाणी साजरे झाले पाहिजेत. लोकमान्य टिळक यांचे एक टीकाकार सर चिरोल यांनी असे मत मांडले की, "आपल्या राजकीय चळवळीस धर्माचा पाठींबा असला म्हणजे चांगले. या उद्देशाने हिंदुस्थानातील अत्यंत लोकप्रिय देव जो गणपती तो आपल्या सर्व चळवळीचे अधिदैवत करण्याची क्लृप्ति टिळकांनी लढविली. वस्तुत: गणपती हा देव हिंदू लोकांचा विद्याधिपती असून ग्रंथाच्या पहिल्या पानावर त्यांचे चित्र घालण्याने त्यांना मोठा आनंद होतो. खेडयात किंवा हमरस्त्याच्या बाजूला दगडास शेंदुर फासून कसातरी आकार आणलेल्या गणपतीचे देऊळ नाही. अशी गोष्ट व्हावयाची नाही. गणपती उत्सवाची नवीन टूम काढून, गणेश मंडळ स्थापन करुन व तरुण तालीमबाज मंडळाचे मेळे तयार करुन लोकांवर आपली छाप बसविण्याची युक्ती टिळकांनी

काढली. ती अद्वितीय होती.... गणपती उत्सवामुळे टिळकांच्या चळवळीचे क्षेत्र फारच विस्तृत झाले." [६]

टिळक यांच्या मते धर्मबुध्दी ज्यांच्या मनाला शिवत नाही, जडाच्या पलिकडे ज्यांची बुध्दी जाऊ शकत नाही त्या लोकांनी घरात बसून राहावे किंवा त्यांनी असल्या उत्सवात भाग घेऊन किमान सहकार्य तरी करावे. [७] त्या मुळे असल्या उत्सवात "व्यक्ती तितक्या प्रवृत्ती" या न्यायाने जे लोक वागतात त्यांना मार्गदर्शन होईल. यात चांगले सुशिक्षित लोक जर सहभागी झाले तर उत्सवाला योग्य वळण लागेल व समाज प्रबोधन होईल. त्यामुळे त्यांनी सुशिक्षित लोकांना एक संदेश दिला की, असले उत्सव सुशिक्षित लोकांना एक संदेश दिला की, असले उत्सव सुशिक्षितांनी शोधून काढले पाहिजेत व त्याचा प्रचार केला पाहिजे. राष्ट्रीयत्व कायम राखण्याचा हाच एक मार्ग आहे. [७] किमान सुशिक्षितांनी असल्या उत्सवाला नावे तरी ठेवू नयेत व त्यांनी बहुजन समाजाची अनास्था करु नये.

ग्रीसमधील लोक ज्याप्रमाणे ऑलिंपिक उत्सव साजरा करतात. तो ही एक देवतेचाच भाग होता. त्या उत्सवात कवि, वीरलोक, पंडित, मुत्सद्दी लोक भाग घेत असल्यामुळेच ग्रीक लोकांची विस्कटलेली घडी नीट बसली. शिवाय रोमन लोकांची सर्कस, आयरिश लोकांचा "तारा" ही जत्रा, लोकमताला जागृत करण्याला फार उपयोगी पडल्या. [८] तेव्हा तशाच प्रकारे गणपती हा आम्हाला उपयोगी पडणार आहे. जर असले उत्सव उद्वेग-कारक वाटत असतील, निरुपयोगी वाटत असतील तर त्या ठिकाणी नवीनच उत्सव आपण सुरु केले पाहिजेत. [९] खेड्यापासून पाड्यापर्यंत, शहरापासून जिल्ह्यापर्यंत असले उत्सव पोहोचले पाहिजेत, साजरे झाले पाहिजेत. सुशिक्षित लोकांनी आपल्या ज्ञानाचा फायदा आपल्याच अज्ञानी बांधवाना

सज्ञान करण्यासाठी केला पाहिजे. सर्व जुने नवे लोक तरुण म्हातारे मिळून हा उत्सव साजरा करून समाज जागृती केली पाहिजे. "समाज तरला तर सुशिक्षित तरतील" असे म्हणून टिळकांनी सुशिक्षित लोकांना त्यात सहभागी होण्यास सांगितले. वरील प्रमाणे"राष्ट्रीय महोत्सवाची आवश्यकता" या लेखात केसरीत जे लेख आले त्यात सुशिक्षितानी काय केलं पाहिजे १ याची माहिती दिली आहे.

टिळकांनी सुरु केलेल्या या उत्सवाची व्याप्ती वाढू लागली. संघटनेचे बळ मिळत गेले. शक्ती वाढू लागली. साहजिकच टिळकांना आनंद वाटू लागला. आपल्या केसरीतील १८ सप्टेंबर, १८९४ च्या अग्रलेखात या उत्सवाबद्दल आपणास समाधान वाटले. असे लिहिले आहे. हिंदूंच्या भवितव्यासंबंधीच्या लेखात ते म्हणतात, "यंदाचा भाद्रपद महिना व विशेषत: गेली अनंत चतुर्दशी वगैरे दिवस मराठ्यांच्या इतिहासात आणि विशेष करून पेशव्यांची राजधानी जे पुणे शहर यांच्या इतिहासात सुवर्णाच्या अक्षरांनी नोंदण्यासारखे गाजले. नागपंचमीचा सण झाल्या दिवसापासून ते पेट गणपती विसर्जनाच्या पर्यंत सर्व पुणे शहर गणपतीच्या भजनाने गजबजून गेले होते. गणपती देवता आजपर्यंत पांढरपेशे वगैरे लोकामध्ये असून त्या देवतेसंबंधाने घरोघरी उत्सव मंत्रपुष्प, कीर्तने, जागरणे वगैरे थाटाने होत असत. हे खरे आहे. तथापि यंदा आम्हा मराठ्यांचा आधारस्तंभ जो वैश्यवर्ग अगर प्रत्यहि निढळाच्या घामाने पैसे मिळवून आम्हा सर्वांची तोंडे उज्वल करणारा साळी, माळी, रंगारी, सुतार, कुंभार, सोनार, वाणी, उद्मी इत्यादी औद्योगिक वर्ग यातील लोकांना यंदा विलक्षण रीतीने सार्वजनिक स्फुरण येऊन त्यांनी हा दिवस साजरा करण्यासाठी जी कांही मेहनत घेतली. ती केवळ अपूर्व आहे. दिवसभर कामधंदा करून घरी आल्यानंतर चकाट्या पिटीत बसणारे, दारु पिऊन गटारात लोळणारे, दारुच्या पायात

बायकोपोरांचे हाल करणारे अथवा तमाशातली अचकट विचकट गाणी ऐकत बसणारे या सर्वांस निदान कांही काळ तरी उपरती होऊन त्यांचा रिकाम वेळ बुध्दीदात्या गणपतीच्या भजनपूजनात गेला ही कांही लहान-सहान गोष्ट नाही. गेल्या १५ दिवसात पुण्यातील रस्ते रात्री मनुष्यांनी फुलून गेलेले असतात. लक्षात ठेवण्याची गोष्ट ही की, प्रत्येक सार्वजनिक गणपतीची खटपट व भजनपूजनाचा थाट मराठे बंधूंच्याकडून झाला आहे. आठ जागी तर गणपतीच्या मूर्ती खरोखरच प्रेक्षणीय होत्या. मेळ्याचा थाट पाहून जर आमची मती गुंग झाली. मेळेवाल्यांचा पोशाख, ताल धरणाऱ्या काठ्या, त्यांचा आवाज त्यांची भक्तीरसाने ओथंबलेली गाणी सर्वत्र स्वधर्माच्या स्तुतीने भरलेले ते वीरश्रीपूर्वक उत्साह आणि त्यांची ती भव्य निशाने इत्यादी शंभर ठिकाणी पाहण्याचा जेव्हा आम्हास अलभ्य लाभ झाला तेंव्हा ..... आमच्या समाजाचे मुख्य स्थळ जे मराठे मंडळ त्यास कांही एक धक्का न पोहोचून आमच्या स्वधर्मप्रेमा अजून जशाचा तसा कायम आहे. हे जेव्हा सर्वत्रांनी पाहिले, तेंव्हा आम्हाला फारच कौतुक वाटले. उत्सावात दंगा होईल हे भय वाटत होते. परंतु पोलीसांच्या बंदोबस्तामुळे व लोकांच्या खबरदारीमुळे विसर्जन प्रसंगी म्हणाण्यासारखा अडथळा आला नाही." [१०]

अशा प्रकारे लोकमान्य टिळकांनी आपल्या उचबळलेल्या भावनांचे प्रतिबिंब या वरील लेखात व्यक्त करताना दिसून येते. उत्सव सुरु केल्यानंतर लोकांच्या उत्साहाबाबत ते समाधान व्यक्त करतात. तर ठरल्याप्रमाणे प्रत्येक गल्लीतील मेळेवाले, तरूण तालीमबाज मंडळी, लेझीम खेळणारे तरुण वर्ग, गुलालाने संपूर्ण शरीर रंगलेली खेडयातील लोक, त्यांचा उत्सव पाहणाऱ्या लोकांची गर्दी, स्त्री-पुरुष लहान-थोर, आबाल-वृध्द यांचे थवे, सनई टिपऱ्या चौघडा, लेझिम अशी वाद्ये या सर्वांचा परिणाम

लोकांच्या मनावर नक्कीच होणार. त्यामुळे लोक या उत्सवात आकर्षीत होतील असे टिळकांना वाटते.

गणपती उत्सव ही नवी टूम आहे. उत्सव फक्त ब्राम्हणांचा आहे. निंदकाचा समाचार घेताना ते लिहितात, "आजपर्यंत आम्ही निरनिराळ्या ठिकाणी भजनपूजन करत होतो. ते आता एके ठिकाणी करु लागल्याबरोबर त्या भजनपूजनातील धर्माचा अंश निःसत्व होऊन त्या जागी करमणूक बया येऊन बसली काय ? प्रत्येक मेळ्यात अदमासे २०-२५ माणसे असतात. १०७ ते १५० मेळे होतात. म्हणजे ३ ते ४००० माणसांनी चार चार तास मेहनत करुन जी गाणी बसवली, ती तालासुरात म्हटली. हजारो स्त्री-पुरुषांनी ऐकली तर याला जर कोणी चैन, लहर, करमणूक असे नाव दिले तर भक्तिपंथ कोणता हेच आम्हास समजत नाही. म्हटले पाहिजे किंवा ज्याला अधर्मवेडाच्या भुताने पछाडले त्यास भजनाचा ब्रम्हानंद कळत नाही असे तरी म्हंटले पाहिजे." ११

टिळकांच्या मते हजारो स्त्री-पुरुषांनी जर या उत्सवातील भजन व गाणी ऐकली, तर संपूर्ण समाजाचे मन उल्हासित होणार आहे आणि आपले विचार समाजापुढे मांडता येणार आहेत. लोक धर्म मार्गावरती येऊन मनोरंजनाबरोबरच समाज प्रबोधन सुध्दा होणार याची खात्री टिळकांना वाटत होती. त्यामुळेच तर त्यांनी खेडयापाडयातील बहुजन समाजाला या उत्सवात सहभागी होण्यास सांगितले. उद्मी व्यापारी लोक या उत्सवात सहभागी झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. या उद्मी व्यापारी लोकांच्या जोडीला सुशिक्षित लोकांची साथ लाभली की, मग बहुजन समाज जागृत व्हायला वेळ लागणार नाही व सुशिक्षिताला पटलेले चांगले सद्गुणी

विचार, बहुजन समाजापुढे मांडताना वर्षातील निदान १० दिवस का होईना प्रबोधन होणार आहे आणि प्रबोधनामुळे असलेल्या वाईट विचारांचा नाश पाकून समाज या उत्सवात ताकून सुलाखून निघणार आहे. त्यासाठी असले उत्सव सुशिक्षितांनी शोधून काढले पाहिजेत असे टिळकांचे मत बनले होते.

टिळकांच्या मते बहुजन समाज, खालचा वर्ग आणि सुशिक्षित वर्ग या दोघांचा जर एकोपा झाला व या समाजाच्या दोन आधार स्तंभानी आपणास हितकारक वर्तन ठेवले तर असणाऱ्या परकीय सत्तेला हादरे बसविता येईल, संकट काळात सुशिक्षितांनी,अशिक्षितांना, पैशाची, सल्लामसलतीची मदत केल्यास आणि हेच सहकार्याचे एकोप्याचे, स्वराज्याचे कार्य श्री गजाननाच्या हातून व्हावे अशी अपेक्षा ते व्यक्त करतात. शिवाय लोक भजनपूजनात गढून गेल्यामुळे भावी राष्ट्राच्या अभ्युदयाचा पाया घातल्यासारखे होणार आहे.

मेळ्यातील दोषासंबंधी टिळक म्हणतात की, उत्सव हे धार्मिकता वाढविण्याचे साधन आहे.... मेळेवाले अशिक्षित असले तरी दांभिक नाहीत. त्यांच्या श्रध्देबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. जसे ख्रिश्चन लोक त्यांचे धर्मगुरु व्यासपीठावरुन वादग्रस्त राजकीय विषय हाताळतात त्याचप्रमाणे आपल्याकडे सुध्दा गणपती उत्सवातून, मेळ्यातून राजकीय प्रश्नांबद्दलचा खल [१२] चाललाच पाहिजे. अशानी लोकांना ब्रिटिशांच्या-कडून केली जाणारी लूट या उत्सवातून आपण सुशिक्षितांनी सांगितलीच पाहिजे. ब्रिटिश मुत्सद्दी आपणास लुटतात कसे ? किती ? हे सुशिक्षितांनी सांगावे. त्यांना हे सांगण्यासाठी व्यासपीठाची गरज भासेल, ही व्यासपीठाची गरज या उत्सवाच्या माध्यमातून मिळेल अशी

टिळकांची अपेक्षा होती. गणेश उत्सवाच्या माध्यमातून बहुजन समाजात जसा लोकसत्तेचा प्रसार करता येईल, तसा अन्य कोणत्याही देवतेच्या उत्सवातून करता येणार नाही. बिपीनचंद्र पाल यांना टिळकांच्या आठवडाभराच्या सहवासात राहिल्यानंतर पाल यानी असे मत व्यक्त केले की, गणपतीच्या उपासनेमध्ये केवळ प्रतिकोपासनेच्या पुनरुज्जीवनाची कल्पना टिळकांच्या मनात नाही. ते फक्त हिंदू धर्माचे अनुष्ठान नाही तर तो भारताच्या जागृत जनशक्तीचे सहाय्याने हा एक स्वदेश सेवेचा यज्ञच टिळकांनी सुरु केला आहे. [१३] गणाची अधिष्ठाता देवता गणपती, प्राचीन भारतात गण म्हणजेच जनसमुदायाचा एकोपा त्यामुळेच या जन-समुहाला जागृत करण्याच्याच उद्देशाने महाराष्ट्रात गणपती उत्सवाची सुरुवात टिळक यांनी केली.

## या उत्सवाची वाढ आणि व्याप्ती -

२० सप्टेंबर, १९०७ ला टिळकांनी श्री. गणपतीकडे स्वराज्य मागितले. पंजाबात व बंगालमध्ये जुलूम दडपशाहीला उत आला होता. उत्सवाच्या निमित्ताने लोकांच्यावर संकट आणले जाते की काय असे वाटत होते. तेव्हा आपणातील एकोपा धैर्य आणि निश्चय या गोष्टीमुळे ब्रिटिश वरिष्ठ अधिका-यांना या उत्सवावर विरजण घालण्याचे धाडस झाले नाही. तेव्हा टिळक म्हणतात की, घरी गेल्यानंतर तुम्हाला सुने... सुने.... वाटू लागेल. स्वराज्य गेल्यामुळे मनाला चटका बसेल असे कांही तरी करा. गणपतीजवळ आम जनतेने आराधना करताना "स्वराज्य", "वैराज्य", "पारमेष्ठराज्य", "अधिराज्य" हे त्या गजाननाकडे मागा."

स्वदेशी व बहिष्काराची वाळू तुम्ही घरात नेऊन पसरवा, त्यामुळे तुम्हाला ज्ञान येईल. स्वराज्य तुमच्या जवळच आहे. "ओळखाल तर सापडेल"

सर्व कांही तुम्हीच करीत आहात. सर्वत्र तुम्हीच वावरता आहात. १४ आता ब्रिटिश अधिकारी परमेश्वराच्या इच्छेविरूद जावू शकत नाहीत. त्यामुळे १९०७ ला गणपती उत्सवात आपल्या चतु:सूत्रीपैकी स्वराज्याचा अर्थ टिळक विषद करू लागले. स्वदेशीचे अंतिम स्वरूप स्वराज्य आहे. जे देशभक्त आहेत ते देशासाठी मरायला तयार होतात. परमेश्वराचाच आदेश आहे की, तुम्ही मरून जगायला शिकले पाहिजे आणि जगण्यासाठी स्वराज्याची आवश्यकता आहे. स्वराज्य आणि स्वदेशी दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. स्वराज्यासाठी लढले पाहिजे असे मत टिळकांनी रद्द नोव्हेंबर, १९०७ च्या गुर्लहोसुर या ठिकाणच्या सभेत व्यक्त केले. १५

टिळकांनी या उत्सवाच्या निंदकांचा समाचार घेतला व ब्राह्मण व मराठे यांच्या एकोप्याचे विचार मांडले. ते लिहितात, "ब्राह्मण आणि मराठे यांची सांगड गेल्या दोन हजार वर्षांपर्यंत तुटली नाही. ती मुसलमानी राजवट असताना १४व्या व १५व्या शतकात सुध्दा टिकली. ती ख्रिश्चनाच्या धर्म प्रसाराच्या जाळ्यात सापडली नाही. आता आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, ब्राह्मण आणि मराठे या समाजाच्या दोन आधारस्तंभानी आपणास हितकारक असे वर्तन आजपर्यंत ठेवले. पुढेही तसेच ठेवले पाहिजे. संकटकाळी पैशाची, सल्लामसलतीची मदत केली पाहिजे. ज्या ज्या मार्गाने समाजाचे संबंध दृढ होत जातील त्या त्या गोष्टी केल्या पाहिजेत. मराठ्यांनी शेतीचा व्यवसाय कारखान्याचा व्यवसाय सांभाळून जर ते निर्व्यसनी झाले तर हल्ली असलेल्या परकिय छत्राखाली सुध्दा आपली प्रगती होणार आहे आणि आपल्या देशाची किर्ती दिगंतरी पोहोचल्याशिवाय राहणार नाही. रसातळाला गेलेला समाज, देश पुन:काळाचे अनंत तडाखे सोसायला तयार झाल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी एकोपा राहणे अत्यंत

महत्वाचे आहे. फाटाफुटीचा प्रयत्न फसला तेंव्हा या समाजाने आजपर्यंत ठेवलेला शांतपणा व दूरदर्शीपणा कायम ठेवावा. आणि हेच कार्य श्री. गणेशाच्या आशिर्वादामुळे पार पडले जाईल यात शंका नाही. अशी बुध्दी प्राप्त होऊन आपला वेळ देवादिकांच्या भजनपूजनात जावो अशी बुध्दी देण्याबद्दल ईश्वराजवळ प्रार्थना करतो. हिंदू लोकांस कलह नको आहे. कलहाची सूत्रे अन्य लोकांच्याकडून हालवली जातात. तेंव्हा अशी सरकारची खातरजमा झाल्यामुळे हिंदू लोकास न्यायाची, निपक्षपातीपणाची प्रजावात्सल्याने वागण्याची प्रेरणादयाळू चक्रवर्तीना व महाराणी व्हिक्टोरीया राणीच्या प्रतिनिधीना आमच्या आकाशातील बापाकडून किंवा गणपतीकडून लाभो अशी प्रार्थना करतो." [१६] असे मत टिळकांनी आपल्या वेगवेगळया लेखातून व्यक्त केल्याचे दिसून येते. श्री. न.र. फाटक "लोकमान्य" या ग्रंथात म्हणतात. "टिळक मराठा आणि ब्राह्मण यांचे एकोप्याचे चित्रण करत असत. कारण या उत्सवाचा आणि मुसलमान लोकांचा दंग्याचा संबंध हा जनक्जन्यभाव सर्व लोकांना माहीत आहे. परंतु या उत्सवापुरता हा संबंध नजरेआड व्हावा आणि सर्व समाजातील लोकांनी शांतपणे हा उत्सव साजरा करावा. त्याला गालबोट लागू नये हिच अपेक्षा टिळकांना होती. हा उत्सव जुनाच आहे. ती नवीन टूम नाही हे सरकारला व आम जनतेबरोबरच निदंकाना सांगण्यासाठी जुन्या काळातील, पेशवाईतील इतिहासाचे जुने दाखले टिळक देत होते. टिळक जुने दाखले समाजाला का करून देत होते ? याचे उत्तर टिळक यांचे एक सहकारी श्री. न.चि. केळकर म्हणतात, "इतक्यायकरीता की, मुसलमान लोकांच्या मनात या उत्सवाबद्दल तेढ निर्माण होऊ नये. आपण नवे सलते कांही करत नसून जुनीच गोष्ट नावारूपाला आणीत आहोत हे दर्शविण्यासाठी [१७] असा खुलासा केला आहे. तर पहिली दोन तीन वर्षे टिळकांनी आपल्या

वृतपत्रातून बराचसा मोठा अंश मळेवाले पद्दे, गायन त्यांची करमणूक यावरच खर्च केला आहे. १२ सप्टेंबर, १८९६ च्या केसरीतील तिस-या अंकात टिळकांनी या उत्सवाचे वाढत जाणारे लोण खेडयातील शहरातील या उत्सवात भाग घेणा-या अभिनंदनासाठी खर्च केल्याचे दिसते. गणपती पुढील आरास, मेळा, वेगवेगळया प्रकारच्या गणेश मूर्ती, गायन, वाद्ये, चौघडा उत्साही वातावरण, लोकांचा स्त्रीया-लहान मुले तरुण सुशिक्षित लोक यासर्वांची त्यानी प्रशंसा केल्याचे दिसून येते.

उत्सव जवळ आला की या उत्सवासंबंधीची माहिती आपल्या "केसरी" व "मराठा" या वृत्तपत्रातून देताना दिसून येते. टिळकांनी आपले सहकारी श्री. कृ.प्र. खाडीलकर याना या उत्सवासंबंधिची माहिती कुठे कुठे मिळेल व "राष्ट्रीय महोत्सवाची आवश्यकता व सुशिक्षितांनी काय केले पाहिजे" या विषयावर लेख लिहावेत असे खाडिलकरांना सुचविले व त्यांना लेखासंबंधी माहिती कुठे मिळेल हे सुचविले. या उत्सवातील दोषासंबंधी एका व्यक्तीने टिळक यांच्याकडे तक्रार केली. प्रत्युत्तरादाखल टिळक म्हणतात, हा उत्सव आता दृढमूळ झाला आहे. हा उत्सव धार्मिकता वाढविण्याचे एक साधन आहे. ते एक हिंदू समाजाचे अंग होऊन गेले आहे. तेव्हा टीकाकारांनी या उत्सवाच्या निर्मात्याचे आभारच मानले पाहिजेत. मेळेवाले दांभिक नाहीत. ते अशिक्षित आहेत. त्यांचे आचरण सुधारणे गरजेचे आहे. हे कबूल केले पाहिजे. हा उत्सव मोहरमची नक्कल जरी असली तरी ती अशी एक नक्कल आहे की, त्या उत्सवाच्या प्रवर्तकांना भूषणप्रद वाटले पाहिजे. यात जुन्यालाच न्यायोचित वळण दिले आहे. मेळेवाल्यांच्या पदात सामाजिक, राजकीय विषय असतात. शिवाय धार्मिक विषय असतात. टिळकांच्या मते ज्याअर्थी संस्कृतचा गंध नसणारी व्यक्ती आपल्या पूज्य अशा ऋषीमुनींची कुचेष्टा करायला कचरत नाही त्याअर्थी मेळयात धार्मिक

धार्मिक विषय असला तरी बिघडले कुठे ? सुधारक जर अंडीब्रँडी सेवन करून ऋषीमुनींची चेष्टा करतात. ख्रिश्चन धर्मगुरु धार्मिक व्यासपीठावरून राजकीय भाषणे बोलतात मग या उत्सवात मेळेवाल्यांचा पदात धार्मिक विषय, राजकीय, सामाजिक विषय आला तरी बिघडले कुठे. धर्म आणि राजकारण यांच्या मिश्रणाला कांही मर्यादा पाहिजेत हे मला कबूल करायला पाहिजे असे टिळकांचे मत होते. [१८] बहुजन समाजाला एक करणारी प्रतिके हवी असतात. आणि अशी प्रतिके राष्ट्रीयत्व राखण्याचे साधन बनतात. समाजाला एकत्र करणारा उत्सव म्हणून, टिळकांनी या उत्सवाची सुरुवात केली व श्री. गणपतीला राजकीय मिथक म्हणून वापरले. जनसमुहाला संघटित तर करायला पाहिजे, त्यांच्यात असणारे गुण अवगुण हे मान्य केले पाहिजेत. तरच या उत्सवाला बळकटी येणार आहे. असाच विचार करून टिळकांनी हा उत्सव सुरु केला. राष्ट्राच्या हरएक बाबतीत उन्नती करणाऱ्या प्रधान साधनापैकी राष्ट्रीय महोत्सव हे एक उत्तम साधन आहे. दसरा हा पूर्वी राजकीय उत्सव होता. पण आज तो धार्मिक उत्सव झाला आहे. हे सर्व उत्सव जनतेच्या मनोरंजनाबरोबरच लोक प्रबोधनाची साधने आहेत. हेच सुशिक्षित लोकांनी लक्षात घेतले पाहिजे. महाराष्ट्रात टिळक यांनी याच दृष्टिकोनातून गणपती उत्सवाचा वापर केला.

महाराष्ट्रात टिळकांनी गणपती उत्सवाच्या बरोबर छ. शिवाजी यांचेसुध्दा राजकीय मिथक वापरले. शिवाजी स्मृती चळवळ व शिवाजी उत्सव सुरु करून त्यांनी समाज प्रबोधनाचे एक खुले व्यासपीठ सुशिक्षितांना निर्माण करून दिले. महाराष्ट्राच्या इतिहासात छ. शिवाजी यांना अत्यंत महत्वाचे आदराचे स्थान दिले जाते. त्याचे कारण महाराष्ट्रात प्रतिकूल परिस्थितीत छ. शिवाजी यांनी स्वत:चे असे स्वराज्य निर्माण केले.

लोकमान्य टिळक यांनी छ. शिवाजी महाराज यांची जयंती सुरु करुन जनसामान्याला परकीय सत्तेच्या शृंखला तोडण्यासाठी जागृत केले. त्यांच्यात जोम व जोश उत्पन्न केला. झोपी गेलेल्या समाजाला जागृत केले व स्वातंत्र्य लढयाच्या संग्रामात त्यांना खेचून आणले.

## महाराष्ट्रातील शिवाजी चळवळ

महाराष्ट्रात शिवाजी चळवळ लो. टिळक यांनी १८९५ ला सुरु केली. टिळक यांच्या पूर्वी छ. शिवाजीच्या कार्याचे वर्णन लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा फुले, ग्रॅन्ट डफ जनार्दन कीर्तने अशा वेगवेगळ्या विचारवंतानी आपआपल्या दृष्टिकोनातून शिवाजीच्या कार्याचे विश्लेषण केले. गुंजीकरांची "मोचनगड" ही कादंबरी, १८८३ चे डग्लर्स यांचे "मुंबई आणि पश्चिम हिंदुस्थान" हे पुस्तक "शिवाजीची छत्री आणि त्याची देना" यावरचे लेख न्या. रानडे यांचे "राईज ऑफ मराठा पॉवर" हा ग्रंथ अशा अभ्यासकांचे लक्ष शिवाजीच्या कार्याकडे लागले व त्यांनी आम जनतेपुढे शिवाजीच्या वेगवेगळया ग्रंथातून, लेखातून आपल्या दृष्टिकोनातून विश्लेषण केले आणि शिवाजीच्या कार्याचे विश्लेषण केले.

ग्रॅट डफ याने शिवाजी शाळेच्या माध्यमातून शिवाजीचे विकृत रुप दाखविले. ग्रॅट डफ यांचा ऐतिहासिक दृष्टिकोन चुकीचा आहे हे जनार्दन कीर्तने यांनी दाखवून दिले. [१८-ब]

महात्मा फुले यांनी शिवचरित्रपर पोवाडा आपल्या दृष्टिकोनातून जनतेसमोर मांडला. शिवाजीला त्यांनी "कुळवाडीभूषण" ही पदवी बहाल केली. शिवाजीला स्वयंभू नेता असे संबोधून त्यांनी रामदास स्वामी व

दादाजी कोंडदेव यांच्या ओंजळीने पाणी पिणारा शिवाजी नव्हता. फुले यांच्या मते शिवाजीने शेतक-यांच्या व बहुजन समाजाच्या तसेच तळागाळातल्या मावळ्यां-यातल्या जनतेच्या कल्याणासाठी काम केले. मी हा पोवाडा खालच्या दलित वर्गाला,[१९] महार, मांग, चांभार, साळी, माळी, कोष्टी अशा जमातीला उपयोगी पडावा म्हणून रचल्याचे फुले यांनी सांगितले आहे.

न्या. रानडे यांनी "राईज ऑफ मराठा पॉवर"या ग्रंथात शिव-चरित्राचे त्यांच्या दृष्टिकोनातून वर्णन केले. रानडे यांच्या मते, शिवाजी-च्या काळात जी राजकीय क्रांती झाली तिची पार्श्वभूमी संतानी सामाजिक क्रांती करून तयार केली होती. सामाजिक क्रांतीच्या आधारावर "मराठा" या राष्ट्राची उभारणी शिवाजीने केली. रानडे यांच्या मते छ. शिवाजीचा हा प्रयत्न फसला. पण ते फसणे उद्बोधक होते. कारण त्यानंतर जातीय अहंकार आणि सनातन्यांची रूढीप्रियता बोकाळली. म्हणून अंतिमत: शिवाजीचा प्रयत्न फसला असे रानडे यांचे मत होते.[२०]

लोकमान्य टिळक यांचे लक्ष शिवाजीकडे वेधायला १८८३ चे डग्लस यांचे पुस्तक, "मुंबई आणि पश्चिम हिंदुस्थान", "शिवाजीची छत्री, समाधीची दैना", १८८६ ला रानडे यांनी समाधी जीर्णोधारासाठी पुण्यात घेतलेल्या जाहीरसभा, गुंजीकरांची "मोचनगड" ही कादंबरी, मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटी १८९४ चे भाषण प्रतापगड, अफजलवध, करकेरीया यांचे अफझलखान वध यांच्यावरील भाषण या सर्व कारणामुळे टिळकांचे लक्ष छ. शिवाजीकडे वेधले गेले असे मत श्री. न.र. फाटक यांनी व्यक्त केलेचे दिसते.[२१]

१८९५ ला लो. टिळकांनी जीर्णोध्दाराची चळवळ सुरु केली व "केसरीत" आवेशयुक्त लेख लिहू लागले. देणग्याची मागणी केली तेव्हा एका विद्यार्थ्याने दोन आणे मदत दिली. अशी देणग्यांची पोच "केसरी" या पत्रातून टिळक देऊ लागले. ३० मे, १८९५ ला हिरा बागेत समाधीच्या दुरुस्तीसाठी सभा बोलावली. त्यामध्ये सर्व जातीजमातीच्या लोकांनी ९,०००/- रुपयांची देणगी गोळा केली. टिळकांनी कॉंग्रेसची अधिवेशनाचा योग साधून शिवाजीला अखिल भारतीय स्वरुप देण्याचा प्रयत्न केला. २९ डिसेंबर, १८९५ ला फुले मार्केटात सभा घेतली. या सभेत कॉंग्रेसचे अध्यक्ष सुरेंद्रनाथ बॅनर्जी व मदन मोहन मालवीय उपस्थित होते. एका वृक्षावर शिवाजीची प्रतिमा ठेवली होती.[२२] या वेळी शिवाजी उत्सवाच्या रुपाने लोकांना एकत्र आणू शकू याची जाणीव टिळकांना झाली व त्यांनी या उत्सवाच्या माध्यमातून शिवाजी व विभूतीची ख्याती देशभर पसरविण्यास सुरुवात केली. १५ मार्च, १८९५ ला रायगड इथे पहिला शिवाजी उत्सव साजरा केला गेला. नंतर या शिवाजी उत्सवाचा प्रसार हळूहळू महाराष्ट्रभर झाला. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर शिवाजी उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जाऊ लागला. "कुलाबा" जिल्हयाच्या क्लेक्टरने हजेरी या उत्सवात लावली होती. क्लेक्टरसाहेबांच्या मते शिवजयंती ही लो लोकांत राष्ट्रीय भावना ओतण्यासाठीच सुरु केल्याचे सांगितले.[२३] टिळक यांच्या मते स्वधर्म, स्वराज्य व स्वराष्ट्र या गुणांचा पुरस्कर्ता शिवाजी होता. म्हणून त्यांच्या गुणांचे अवलंब आपण केला पाहिजे. वरील गुण लोकांच्या अंगी बाणवावे, हा प्रधान हेतू समोर ठेवून शिवाजी उत्सव सुरु करण्यात आला.

१८९५ ते १९२० या काळात शिवाजी चळवळ मोठ्या प्रमाणात देशभर पसरली. पंजाब, महाराष्ट्र, बंगाल अशा राज्यात ती पसरली.

स्वदेशी चळवळीच्या काळात तर शिवाजींच्या उत्सवाला उधाण स्वरूप आले. टिळकांच्या राजकीय चळवळीच्या आयुधातील ही चळवळ हे एक हत्यार होते. शिवाजी हा एक अवतारी पुरूष होता. त्यांनी आपल्या लोकांसाठी स्वराज्याची स्थापना केली. त्यातून त्यांनी आपल्या राजकीय विचारांचा प्रसार व प्रचार करण्याचा प्रयत्न केला.

शिवाजी चळवळीला त्या काळात आम जनतेचा पाठिंबा मिळाला. टिळकांच्या राजकीय आकांक्षाना या मधून वाचा फुटली. त्यांनी आपली या बाबतची आपली भूमिका मोठया चातुर्याने मांडली होती.

शिवाजी हा अवतारी पुरूष होता असे टिळकांचे मत आहे. सुधारकांनी आणि बुध्दीवाद्यांनी त्यांचे मत खोडून काढले पण अवतार कल्पना लोकांच्या मनात अत्यंत खोलवर रूजलेली आहे. हे लक्षात घेऊन टिळकांनी आपल्या भूमिकेचे मोठया अभिनिवेशाने समर्थन केले... ते लिहितात, "छ. शिवाजी महाराज हे अवतारी पुरूष होते. कारण त्यांच्यावर ईश्वराने खास कृपा केली होती. कोणत्याही कर्त्यापुरूषावर ईश्वराने खास कृपा केल्याशिवाय तो मोठमोठाली कार्ये अंगिकारू शक्त नाही. पण ज्यावेळी शिवाजी यांचा उत्सव आम्ही करतो त्यावेळी ते केवळ अवतारी पुरूष होते. म्हणून करत नाही तर ते एक मार्गदर्शक पुरूष होते म्हणून करतो. राम जयंती व शिवजयंती यामध्ये जो भेद आहे तो हाच आहे की, शिवाजी हा आपल्या- पैकीच एक थोर पुरूष होता व त्याच्या कार्यास ईश्वरी साहाय्य मिळत गेले. रामाचा लंकेवरील विजय पौराणिक आहे. तर शिवाजीचे सर्व पराक्रम ऐतिहासिक आहेत. पण शिवाजी हा ऐतिहासिक पुरुष असला तरी तो अवतारी पुरुष होता. सुधारक ज्याला थोर पुरूष म्हणतात त्यास आम्ही अवतारी पुरूष म्हणतो. मनुष्याच्या अंगी अलौकिक गुण असणे ही ईश्वराची

देणगी आहे आणि त्याच्याशिवाय त्यांच्या हातून मोठमोठी कामे निर्विघ्नपणे पार पडणार नाहीत." [२४] टिळकांनी त्यास विभुतीरूप देण्याचा प्रयत्न केला. त्यांचा शिवकार्याच्या ईश्वरी स्वरूपावर पूर्ण विश्वास होता. म्हणून ते लिहितात, "ज्यांनी शिवजयंतीचा उत्सव सुरू केला त्यांची लोकांस फसविण्याची बिलकुल इच्छा नाही व नास्तिक सुधारकाप्रमाणे ईश्वरी कृपेचा अंश काढून टाकून थोर पुरूष आपली कामे प्रयत्नाने करतात असेही खोटे विधान करण्याचा आमचा इरादा नाही. [२५]

## छ. शिवाजी उत्सव आपण का करावा -

छ. शिवाजी महाराजांचा उत्सव आपण का करावा ? या विषयी २८ एप्रिल, १९९६ च्या केसरीच्या अंकात शिवजयंतीचा राष्ट्रीय उत्सव या लेखात टिळक म्हणतात, "ज्या थोर पुरूषांनी आपल्या देशाचे नाव इतिहासात अजरामर केले किंवा ज्यानीआपल्या कर्तबगारीसाठी आमच्यातही कांही पाणी आहे असे जगास दाखविले त्यांच्या कृत्यांचे कितीही अभिनंदन केले तरी, त्यांच्या ऋणातून सर्वस्वी मुक्त होणे कठीण आहे. शिवाजी महाराजांचा उत्सव करण्यात त्याबद्दलची कृतज्ञताबुध्दी हेच मुख्य कारण होय. ज्याप्रमाणे आपण आपल्या पढ्लांचे स्मरण कायम करून ठेवतो त्यांचा पूर्वापार चालत आलेला लौकीक कायम राखतो. त्याचप्रमाणे राष्ट्रातील महापुरूषांचे स्मरण हे राष्ट्रीयत्व राखण्यास एक चांगले साधन आहे. एक राष्ट्रीयत्व म्हणजे काय ? तो दृश्य पदार्थ नव्हे. ती एक प्रकारची कल्पना असून ती सतत जागृत ठेवली तरच ती टिकण्यासारखी आहे. ज्या राष्ट्रांनी ती कायम राखली आहे त्यांनी आपल्या ऐतिहासिक थोर पुरूषांची मदत घेतली आहे असे दिसून येईल." सर्व लोकांच्या आदरास पात्र झालेल्या जितक्या अधिक चांगल्या वस्तु असतात त्या मानाने एकराष्ट्रीयत्वाची

कल्पना ही अधिकाधिक होत जाते. राष्ट्रोचे हितकर्ते असतात ते अशी कांहीतरी रचना करून ठेवतात, की त्या सर्वांचे लक्ष एकाच गोष्टीकडे लागते व लोकांना आपण एकाच राष्ट्रातील व्यक्ती आहोत असे वाटू लागते. प्रत्येक देशअभिमान्याचे हेच कर्तव्य ठरते, की अशा वस्तु ज्या लोकांच्या आदरास पात्र असतील त्या लोकांपुढे मांडल्या पाहिजेत. हेच देश अभिमान्यांचे कर्तव्य ठरते. सर्व जाती जमाती त्यात आल्या पाहिजेत." म्हणून राष्ट्रीयत्व राखण्याचे कार्य शिवाजी उत्सवातून होते असे टिळकांचे मत आहे. [२६]

या उत्सवाच्या फलाबद्दल टिळक म्हणतात, "शिवाजीच्या चरित्राचे पारायण केल्याने अथवा शिवजयंतीचे उत्सव केल्याने कोणी शिवाजी होवू शकतो असे नाही. पण ज्या प्रमाणे अलेक्झांडरचे चरित्र ज्यूलिएट सीझरला प्रोत्साहन देण्यास कारणीभूत झाले त्याप्रमाणे शिवाजी महाराजांच्या चरित्रापासून कालांतराने ज्या पुरुषांच्या अंगी नैसर्गिक बुध्दी किंवा ओज असेल त्यास उमेद येण्याचा संभव आहे. थोर पुरुषांची चरित्रे, पुतळे, जयंत्या त्या एवढयाचसाठी की, त्यात थोडातरी ईश्वराचा अंश असतो." "राष्ट्राच्या अभ्युदयासाठी रामदास"शिवाजी सारखे पुरुष जन्माला आले पाहिजेत, म्हणजे त्यांनी हिंदू किंवा मुसलमानांचा वध केला पाहिजे असे नाही. ज्यांनी हा उत्सव सुरू केला त्यांचा असा मनोदयही नाही." [२७]

लोकमान्य टिळक यांच्या मते, राष्ट्रीयत्व व देशाचा अभिमान या कल्पना तशा जुन्याच आहेत. राजनितीला धर्मापासून फारकत देण्याची कल्पना अलिकडची आहे. शिवाजीच्या काळात राष्ट्रीयतेचा धर्म हा पोषक होता. पण महाराजांनी कोणता हेतू मानला तरी त्यामुळे राष्ट्रोदय

व राष्ट्रउन्नती खरोखरच झाली. हे सर्वांस मान्य आहे. प्रजेचे कल्याण करणे हाच त्यांच्या राज्यव्यवस्थेचा मुख्य हेतू होता. [२८] टिळक यांच्या मते शिवाजी हा प्रगतीचा भोक्ता होता. शिवाजीने परिस्थितीचे बंड मोडून काढले. ते मुसलमानांचे शत्रू नव्हते. तो लढा धर्माधर्मातील लढा नव्हता तर तो जुलूम व स्वातंत्र्यामधील लढा होता. छ. शिवाजीने अफझलखानास मारले ते तो केवळ मुसलमान होते म्हणून मारले नाही तर तो महाराष्ट्राच्या प्रगतीला अडथळा करण्यासाठी आला होता म्हणून त्यास ठार मारले. राष्ट्राला सजीव करणारा, एकत्र आणणारा शिवाजी सारखा पुरूष मिळणे कठीणच. टिळकांच्या मते शिवाजीच्या टाइमचे बीज एकच " "स्वत:वर विश्वास, लोकांवर विश्वास", स्वराज्याची कल्पना महाराष्ट्रातील पूर्वजानी आम्हांस दिल्या. परिस्थितीला वळण देणे हे अवतारी पुरूषाचे कर्तव्य असते. स्वराज्य व स्वदेशप्रीती हे शिवाजीच्या जीवनाचे खरे रहस्य आहे." [२९] टिळकांचा उद्देश शिवाजीला (राष्ट्रीय वीरपुरूष) National Hero राष्ट्रीय विभूतीच्या स्थानावर न्यायचे हा होता. टिळक यांच्या मते प्रत्येकाने जातीकडे व धर्माकडे न पाहता सर्व राष्ट्राकरीता प्रयत्न केला पाहिजे. शिवाजीने कोणत्याही धर्माला त्रास दिला नाही. राजसत्ता मुसलमानांच्या ताब्यात असल्यामुळे त्यांनी जुलूम केला. शिवाजीने जुलूम करणाऱ्यांना शासन दिले. आपल्या स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नात जे जे कांही अडथळे येतील ते नाहीसे केले. कलकत्ता या शहरातील एका भाषणात टिळकांनी शिवाजीला तुम्ही मराठी समजा, बंगाली समजा, किंवा रजपूत समजा पण आपण त्यांच्या कार्यापासून आपला उध्दार करून घेतला पाहिजे असे टिळकांनी मत मांडले.

१९०६ ला शिवाजीची ख्याती बंगालात पोहोचली. देऊसकर या आडनावाच्या व्यक्तीने शिवाजी उत्सवाची माहिती बंगाली लोकांना करून

दिली व शिवजयंती बंगालमध्ये मोठ्या थाटामाटाने साजरी करण्यात आली. ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन यांने बंगालच्या फाळणीचा निर्णय घेतल्यामुळे देशभक्तीच्या व स्वातंत्र्याच्या, स्वराज्याच्या ज्वाला संपूर्ण देशभर पसरायला वेळ लागला नाही. टिळकांना त्यामुळे स्वराज्य, स्वदेशी बहिष्कार, रा. शिक्षण या चतु:सूत्रीचा प्रसार करता आला व आपल्या राजकीय चळवळीला आमजनतेचा पाठिंबा मिळविता आला. महाराष्ट्रात आम जनतेला व बहुजन समाजाला संघटित करुन, जागृती घडवून आणण्याचा खटाटोप करता आला. [30]

शिवाजीने केले ते त्याच्या काळात अनुरुप असे कार्य केले. त्याची आज नक्कल करावयाची नाही. ज्या आकांक्षेने पराक्रम गाजविला त्या आकांक्षेचे स्फुरण यावे असा हेतू असल्याचे टिळकांनी स्पष्ट केले.

टिळकांच्या मते हा उत्सव आपण करतो कारण -

टिळकांच्या मते हा उत्सव आपण करतो कारण बहुजन समाजामध्ये शहाणपणाचे विद्वत्तेचे कर्तृत्वाचे बीजारोपन व्हावे म्हणून हा उत्सव करतो. उदात्त विचार, देशाविषयी कळकळ उत्पन्न व्हावी यासाठी शिवाजीच्या चरित्रासारखे कोणतेही साधन नाही. शिवाजीला महाभारतापासून स्फूर्ती मिळाली, आम्हाला त्यांच्या उत्सवापासून मिळाली पाहिजे असे टिळकांचे मत आहे. टिळकांच्या मते राष्ट्रातील लोकांची मने जेंव्हा अडाणी होती, लोक पशुसारखे घोरत पडलेली होती, सर्व समाज जीवन अंध:कारमय झाले होते. तेंव्हा शिवाजीने माणसाला माणूस म्हणून जगायला शिकविले. पूर्वीचे लोक राजाच्या आज्ञेचे पालन मुकाटपणे करीत असत. स्वतंत्र होण्याची बुध्दी त्यावेळच्या लोकांत नव्हती. अशावेळी सर्व हिंदुस्थानला स्वातंत्र्याचा मार्ग

दाखविण्याचे कार्य शिवाजीने केले. त्यांचा हा उत्सव आहे. सर्वसाधारणपणे परिस्थिती... परिस्थिती... म्हणतात म्हणजे काय ? मी करीन ती परिस्थिती अशी बुध्दी असावी असे टिळकांचे मत होते. शिवाजीने परिस्थितीचे बंड मोडून काढून स्वराज्य स्थापन केले आणि त्या स्वराज्य स्थापणेसाठी आपण त्यांचा उत्सव साजरा केला पाहिजे. यातच खरे स्वराज्याचे व शिवकार्याचे रहस्य दडलेले आहे असे टिळकांचे मत आहे.

उत्सवाचा प्रसार व वाढ -

महाराष्ट्रात शिवाजी उत्सव १८९६ पासून मोठया प्रमाणात होऊ लागला. टिळक असल्या उत्सवात आपली उपस्थित राहात असत व एखाद्या विषयावर व्याख्यान देत असत. पुणे, मुंबई, वाई, बेळगाव, वाराणशी अशा शहरातून शिवाजी उत्सव साजरा केला जाऊ लागला. शिवाजी मेमोरियल फंड स्थापन झाला. त्यासाठी पैसा गोळा करण्याचा प्रघात पडला. बडोदा इथे सुमारे ३०० लोकांच्या बैठकीत शिवाजी उत्सव साजरा केला. या उत्सवात हरिदासाचे कीर्तन जमलेल्या लोकांपुढे लावले जाई. शिवाजीच्या कार्याची महती गाईली जावू लागली. भजन, कीर्तन, दांडपट्टा अशा मैदानी खेळाचे प्रात्यक्षिके होवू लागली. [३१]

जपान इथे शिवाजी उत्सव -

१९०५ साली जपानमध्ये टोकीओ येथे शिवाजी उत्सव साजरा झाला. त्यावेळी अध्यक्ष बॅरन नायब खांदा म्हणाले, "शिवाजी महाराजासारखे सत्पुरुष, मग ते कोणत्याही धर्माचे असोत, आणि कोणत्याही देशातले असोत, त्यांच्या सन्मानार्थ देशभेद, वर्णभेद, टाकून देऊन आम्ही पुढे धावतो....

शिवाजी सारखा पुरुष आपल्याच राष्ट्राच्या उध्दारासाठी निपजतात असे नाही. सर्व जातील मनुष्यांचे उन्नतीसाठी व हितासाठी त्यांचा जन्म असतो." यावर १३/६/१९०५ च्या अंकात केसरीकार म्हणतात; "शिवाजी महाराज केवळ हिंदुस्थानचेच महापुरुष नव्हते तर सर्व जातील मनुष्याला पूज्य वाटणारी अशी विभूती होण्यास योग्य आहेत. हे कोणाच्या लक्षात येईल.[32]

प्रतिकारात्मक शिवाजी उत्सव - कलकत्ता

१९०३ साली कलकत्ता इथे सखाराम देउसकर यांनी बंगाली भाषेत "शिवाजीचा थोरपणा" हा ग्रंथ लिहिला. त्याच्या ताबडतोब ५००० प्रती खपल्या. मुस्लीम लोकसुध्दा या उत्सवात सामिल झाले होते. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, व डॉ. मलिक यांची भाषणे झाली. बंगाली लोकांच्यातली मरगळ नाहीसी व्हावी व आखाडे स्थापन व्हावेत आणि प्रतिकाराची शक्ती यावी याच हेतूने हा बंगालमधील शिवाजी उत्सव होता. प्रो.सरलादेवी यांनी महाराष्ट्रातील चाररित बंगाली लोकांना माहिती व्हावी म्हणून त्या पुण्याला टिळकांची भेट घेण्यास आल्या. बंगालमध्ये मर्दानी खेळाचा पायंडा पडला. लोकप्रतिकाराच्या चळवळीसाठी या उत्सवात एकत्र येऊ लागले. आपल्यावर राज्य करणाऱ्या अन्यायी व अत्याचारी सरकारला शह यावा याच हेतूने बंगालचा उत्सव सुरु झाला असे प्रो.सरलादेवी यांचे मत होते.[33]

अनंत जनार्दन करंदीकर यांच्या मते शिवाजी महाराजानी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना करुन यवनांच्या आक्रमणाची वाट परतवली. यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, शिवाजी हे

महाराष्ट्राचेच नव्हते तर ते एक भारताचे स्वातंत्र्यवीर होते. त्यांचाच उत्सव टिळकांनी आरंभल्याचे दिसते. शिवाजी उत्सव महाराष्ट्रामध्ये [३४] साजरा केला जाऊ लागला. रायगडावरती टिळकांच्या हजेरीत शिवाजी सोहळा झाला व हजारोंच्या संख्येने लोक या सोहळ्यास हजर राहू लागले व आपल्या "केसरी" या वृत्तपत्रातून "शिवाजीचे नाव तुम्ही गाजवा रे" असे लेख लिहू लागले. "केसरी"तून शिवाजी स्मारक फंडाची प्रस्तावना देऊ लागले. रायगडच्या दुर्दशेबद्दल लेख लिहून शिवाजी स्मारक फंड निधी गोळा केला जाऊ लागला.

या काळात मराठी साहित्य आणि संस्कृतीवर शिवाजीचा पगडा व प्रभाव पडू लागला. कथा कादंबरी, नाटके, निबंध, शिवचरित्र, शिव जीवन रहस्य वर्णीले जाऊ लागले. या साहित्याचा उद्देश राष्ट्रीय होता. आणि सद्य परिस्थितीत शिवाजीपासून आपण काय शिकावे हे त्यात सांगितले जाऊ लागले. त्यामुळे त्यातील अनेक नाटकावर बंदी घातली जाऊ लागली. त्या काळात शिवाजी राष्ट्रीय स्वाभिमानाचा व आत्मसन्मानाचा केंद्रबिंदू बनला. देशभर वीरपुरुष म्हणून शिवाजीचा उत्सव सुरु झाला.[३४] मराठी साहित्यावर शिवाजीचा प्रभार पडल्यामुळे "कीचकवध" आणि "बंधविमोचन" यासारखी नाटकावर सरकारने बंदी घातली. "कीचक" या नाटकातीले पात्राला लोक कर्झन म्हणून संबोधू लागले. अशी नाटके पाहण्यास आमजनता गर्दी करु लागली.[३६] त्यामुळे लोकांच्यात असंतोष पसरायला वेळ लागला नाही. सरकारने अशा नाटकांवर बंदी घातली या साहित्याचा उपयोग राष्ट्रीय बाणा तयार करणे, लोकांच्यात आत्म-विश्वास वाढविणे त्यांना संघटित करणे व त्यांच्यात जागृती आणणे यासाठी झाला. हे समाज प्रबोधनाचे खुले व्यासपीठ ठरुन समाजात जिवंतपणा आणू लागले. देशभर जागृतीचे वारे वाहू लागले. अशी जागृती कायम ठेवण्यासाठी काय करावे याचा खल सुरु झाला. एका

वर्तमानपत्रात तर शिवाजीच्या नावे देवळे बांधावित अशी सूचना करण्यात आली होती. त्याच वर्तमानपत्रात असेही सुचविण्यात आले होते की, शिवाजीच्या मूर्तीची स्थापना करुन घरोघरी या मूर्तीची पूजा करण्यात यावी. ३७

थोडक्यात ही एक अवतारी पुरुषाची विभूतीपूजा करण्याचाच प्रकार होता. ही चळवळ याच काळात महाराष्ट्राबाहेर पसरली. शिवाजी हिंदूंच्या पुनरुत्थनाचा, स्वराज्याचा व स्वातंत्र्य चळवळीचा प्रतिक ठरला. पारतंत्र्यात राहणाऱ्या लोकांना असे शिवाजीसारखे वीर पुरुष नेहमीच प्रेरणा देतात. लो. टिळकांनी स्वराज्य, स्वातंत्र्य व जनजागरण या कार्यासाठी आपल्या अनेकविध साधनापैकी गणपती आणि छ. शिवाजी यांचे मिथक बनविले. स्वराज्यासाठी आमजनतेला स्वातंत्र्याच्या रणांगनात खेचून आणले. त्यांच्यात जागृती केली. सर्वसामान्यापासून सुशिक्षितांपर्यंत, लहानापासून थोरापर्यंतच्या लोकांना या दोन उत्सवात आणून त्यांना क्रियाशील बनविले. दडपशाहीविरुद्ध जनतेला पेटवून उठविले. हेच कार्य टिळकांनी पंजाब, बंगाल या प्रांतात केले. हे दोन उत्सव त्यांनी बाहेरच्या राज्यात नेले. समाजाच्या एकोप्यासाठी त्यांनी शिवाजी व गणपती राजकीय मिथक बनविले.

राजकीय मिथकाची आवश्यकता -

छ. शिवाजी हे महाराष्ट्राचे दैवत गणले जाते. तर गणपती हा प्रत्येक माणसांच्या देव्हाऱ्यात असतो. तो त्यांनी सार्वजनिक ठिकाणी आणला व राजकीय प्रबोधनासाठी त्याचा वापर केला गेला. प्रा. नलिनी पंडित यांच्या मते टिळकांना आपल्या जहाल राजकारणाची उभारणी शिवाजी आणि गणपतीसारख्या उत्सवाच्या माध्यमातून करावयाची होती.

ती त्यांनी संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाच्या भावनेवर अनुसरून केली. चिपळूणकरांना स्वाभिमानी देशभक्ती, राष्ट्रभक्तीच्या पायावर राष्ट्राची उभारणी करावयाची होती. आणि टिळकांना त्यालाच खतपाणी घालून राष्ट्राची उन्नती करावयाची होती.

लोकांच्या आत्म्याला हात घातल्याशिवाय लोक जागृत होणार नाहीत. तेव्हा धार्मिक कर्मकांडात्मकांचा प्रतिक गणपती हा असून शिवाजी हा स्वराज्याचा प्रतिक म्हणून टिळकांनी वापरला. वेगवेगळ्या जाती-जमातीत राहिलेल्या समाजाला एकत्र आणण्यासाठी गणपती व शिवाजी या दोन प्रभावी मिथकांचा वापर टिळकांनी केला. मनोरंजनाबरोबरच समाज प्रबोधनासाठीचे व्यासपीठ निर्माण केले. प्राचीन काळापासून राजकीय मिथकाचा उपयोग, चांगल्या व वाईट कार्यासाठी राजकारणी व्यक्तीनी केल्याचे दिसून येते. लोकांची श्रध्दा, परंपरा अभिव्यक्त होण्यासाठी व लोकांचे पाठबळ आपल्या पाठीशी असावे व लोकांनी आपल्या राजकारणाला अधिमान्यता द्यावी म्हणून राजकीय मिथकाचा वापर होत असल्याचे दिसते. राजकीय मिथकाचा उपयोग सत्ता संपादन करण्यासाठी केला, की समाजात दुही, बिघाड, आणण्यासाठी केला, काय समाजाच्या कल्याणासाठी केला याला फार महत्व असते. टिळकांनी गणपती आणि शिवाजी या दोन ताकद्वान मिथकाचा उपयोग "समाज जागृती","समाजाचे ऐक्य", "स्वराज्य" या कारणासाठी केला. राजकीय मिथके आणि कर्मकांडे हातात हात घालून येत असतात. मिथकाचे वैशिष्ठ्य म्हणजे राजकारणापासून अनभिज्ञ असणाऱ्या समाजाला राजकारणात खेचण्याचा प्रयत्न त्यात असतो. मिथका-मध्ये कोणी वैभवशाली परंपरा सांगेल, तर कोणी आपल्या थोर संस्कृतीची ओळख काढून देईल. तेव्हा स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये टिळकांनी बहुजन समाजाला राजकारणात खेचण्यासाठी त्याना जागृत करण्यासाठी त्यांचे

संघटन करण्यासाठी राजकीय प्रबोधनासाठी मिथकाचा वापर केल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रात शिवाजीच्या राजकीय मिथकाचा उपयोग लोकहितवादी, फुले रानडे यांच्यापासून टिळकापर्यंत केला गेल्याचे दिसते. मिथकांचा उपयोग करून जनमानस राजकीय कृती करण्यासाठी प्रवृत्त केले जाते आणि त्यामुळे आपल्या राजकारणाला या उत्सवाद्वारे दिशा देऊ शकले. शिवाजीबद्दल व लोकांच्या राष्ट्रीयत्वाबद्दल लोकांच्या मनात जे ज्ञान होते त्याला एक वळण देण्याचा प्रयत्न केला गेला. त्यात एक आशय ओतण्याचे काम या मिथकाने झाले. शिवाजी हा एक राष्ट्रपुरुष होवून गेला. पण त्याचे म. फुले, न्या. रानडे, लो. टिळक यांनी छ.शिवाजीच्या जीवनकार्याचे रहस्य आपआपल्या पध्दतीने सांगितले व समूहमनाच्या ठायी असणाऱ्या अवकाशात स्वत:ला अभिप्रेत असणारा अर्थ भरून आपल्या कार्याला अनुकूल अशी भूमी तयार करून घेतली. आपल्या कार्यासाठी पाठींबा मिळवायचा यातून प्रयत्न केला.

......

## प्रकरण दुसरे

## संदर्भ ग्रंथ


१) श्री.केळकर, न.चि. - लोकमान्य टिळक यांचे चरित्र, खंड पहिला, केळकर, न.चि., पुणे, १९२३, पृ.क्र. ४२०.

२) अ) श्री.केळकर,न.चि. - लोकमान्य टिळक यांचे चरित्र, खंड पहिला, केळकर न.चि., पुणे, १९२३, पृ.क्र. ४२३.

ब) श्री.फाटक, न.र. - लोकमान्य, मौज प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट, १९७२, पृ.क्र. ९७.

३) समग्र लोकमान्य टिळक खंड ४ था, केसरी प्रकाशन पुणे, १९७६, पृ.२२.

४) श्री. फाटक, न.र. - लोकमान्य, मौज प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट, १९७२, पृ.क्र. ९७.

५) समग्र लोकमान्य टिळक खंड ४ था, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६, पृ.क्र.२३.

६) श्री. केळकर, न.चि. - लोकमान्य टिळक यांचे चरित्र खंड १ला, केळकर, न.चि., पुणे, १९२३, (भाग १९वा) पृ.क्रे. ४२०.

७) श्री. केळकर, न.चि. - लोकमान्य टिळक यांचे चरित्र खंड पहिला, केळकर न.चि., केळकर प्रकाश, पुणे, १९२३, पृ.क्र. ४२४.

८) श्री. केळकर, न.चि. - उक्त, पृ.क्र. ४२५.

९) श्री. केळकर, न.चि. - उक्त, पृ.क्र. ४२५.

१०) श्री. फाटक, न.र. - "लोकमान्य", मौज प्रकाशन, मुंबई, १९७२, पृ.क्र. ९४.

११) श्री. फाटक, न.र. - लोकमान्य, उक्त, पृ.क्र. ९५.

१२) श्री. फाटक, न.र. - "लोकमान्य", उक्त, पृ.क्र. ९९.

१३) करंदीकर, अनंत जनार्दन - "क्रांतीकारक टिळक नि त्यांचा काळ",
काळ प्रकाशन, पुणे, १९६९, पृ.क्र. १३९.

१४) समग्र लोकमान्य टिळक खंड ६ वा, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६,पृ.क्र.६८५.

१५) समग्र लोकमान्य टिळक, खंड ६ वा, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६,
पृ.क्र. ६९९.

१६) श्री. फाटक, न.र. - "लोकमान्य", मौज प्रकाशन, मुंबई,
ऑगस्ट, १९७२, पृ.क्र. ९६-९७.

१७) श्री. फाटक, न.र. - "लोकमान्य", मौज प्रकाशन, मुंबई,
ऑगस्ट, १९७२, पृ.क्र. ९७,.९९, १००.

१८-अ,ब) श्री. फाटक,न.र.- "लोकमान्य" मौज प्रकाशन, मुंबई,
ऑगस्ट, १९७२, पृ.क्रे. १०१.

१९)अ)डॉ.चौसाळकर, अशोक - महाराष्ट्रातील शिवाजी उत्सव आणि
गणेश उत्सव, प्रसिद्दोन्मुख लेख.
ब) कीर व मालशे (सं.) म.जोतीराव फुले यांचे समग्र वाङ्मय,
महाराष्ट्रातील साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई, १९७६, पृ.क्रे. १-३८.

२०) डॉ.चौसाळकर, अशोक - महाराष्ट्रातील शिवाजी उत्सव आणि
गणेश उत्सव (प्रसिद्दोन्मुख लेखातून)

२१) श्री. फाटक, न.र. -"लोकमान्य", मौज प्रकाशन, मुंबई,
ऑगस्ट, १९७२, पृ.क्र. १०२.

२२) श्री. फाटक, न.र. -"लोकमान्य", मौज प्रकाशन, मुंबई,
ऑगस्ट, १९७२, पृ.क्र. १०१, १०२.

डॉ. चौसाळकर, अशोक, महाराष्ट्रातील शिवाजी आणि गणेश उत्सव.

२३) Kulkarnee,N.H. - Shivaji Festival in Maharashtra,
6-80, in Shivaji and Indian Nationalism,
Ed. B.K. Ahluwalia and Shashi Ahluwalia,
Cultral Publishing House, Delhi,1984,
Page 60-80.

२४) टिळक लोकमान्य, लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख, भाग १, खंड १,
केसरी मराठा संस्था, पुणे, १९२२, पृ.क्र. ५४१-४२.

२५) टिळक, लोकमान्य, उक्त, पृ.क्र. ५४८.

२६) श्री. फाटक, न.र. -"लोकमान्य", मौज प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट, १९७२,
पृ.क्र. १०९.

ब) समग्र लोकमान्य टिळक, खंड ४था, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६,
पृ.क्र. ३५, ३६.

२७) श्री. फाटक, न.र. - "लोकमान्य", मौज प्रकाशन, मुंबई, १९७२, पृ.क्र.१०९.

२८) श्री. फाटक, न.र. - "लोकमान्य", मौज प्रकाशन, मुंबई, १९७२,
पृ.क्र. ११४

२९) श्री. फाटक, न.र. - "लोकमान्य", मौज प्रकाशन, मुंबई, १९७२,
पृ.क्र. ११८, ११९.

३०) श्री. फाटक, न.र. - "लोकमान्य", मौज प्रकाशन, मुंबई, १९७२,
पृ.क्र. ११५, ११७.

३१) Desai, S.P. - The Shivaji Commemoration Movement,
Dept. of Archives, Bombay, 1983,
Page 67-68.

३२) केसरी-प्रबोध, केसरी महोत्सव मंडळ, खंड १ ला. केसरी सुवर्ण
महोत्सव दिनानिमित्त, केसरी-मराठा ट्रस्टीस अर्पण केलेला ग्रंथ,
१९३१, पृ. १४४.

३३) श्री. केळकर, न.चि. - "लोकमान्य टिळक चरित्र खंड दोन",
उत्तरार्ध खंड-२, पृ.क्र. ४५.

३४) श्री. करंदीकर, अ.ज. - क्रांतीकारक टिळक नि त्यांचा काळ,
काळ प्रकाशन, पुणे, १९६९, पृ.क्र.१७०.

३५) Desai, S.P. - The Shivaji Commemoration Movement,
Dept. of Archives, Bombay, 1983,
Page 243-44.

-----